
अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : १३६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२
www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ ।

# उबाठा सेनेच्या नेत्याचा नशीला प्रताप
# पोलिसांचा छापा
# सापडली अफूची शेती







✔ धाराशिव/प्रतिनिधी

**जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या प्रचारावरुन तापलेलं वातावरण अन् राजकीय गरमा-गरमीच्या चर्चांचा धुराळा अद्याप धाराशिव जिल्ह्यासह शेजारच्या सोलापूर जिल्ह्यात उडलेला असतानाच, धाराशिव जिल्ह्यात ठाकरे गटाच्या तालुका उपप्रमुखाचं नशिल्या अफुच्या अवैध शेतीचं कांड समोर आलं आहे. तब्बल ४८५ किलो वजनाची आणि ७२ लाख ८४ हजार रुपयांच्या किंमतीची झाडं या पदाधिकाऱ्याने आपल्या शेतात लावली होती. याप्रकरणी पोलीसांनी छापा टाकल्यानंतर राजकीय क्षेत्रासह धाराशिव-सोलापूर जिल्ह्यात खळबळ माजली आली. गुरुवारी या जिल्ह्यात चर्चेचं वादळ आणि खळबळ उडाली ती ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्याच्या शेतामधील नशिल्या अफूच्या शेतीवरुन. ज्या नशिल्या अफुच्या शेतीची धक्कादायक बाब समोर आली. याप्रकरणाच्या कारवाई अंतर्गत मोठ्या प्रमाणात अफूची झाडं जप्त करण्यात आली आहेत.**

विशेषत्वे, ठाकरे गटाच्या शिवसेना पदाधिकाऱ्याच्या शेतात जेव्हा कारवाईसाठी 'खाकी'वर्दीची टीम पोचली त्यावेळी त्यांनी जे इथं पाहिलं त्यावर क्षणभर त्यांचाच विश्वास बसला नाही, एवढं मोठं धक्कादायक कांड इथं त्यांना दिसलं. अफुची शेती पिकवण्याचा हा पहिल्याच गंभीर प्रकार समोर आला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यामधील दशमेगाव शिवारात पट्ट्या बहाद्दर ठाकरे गटाच्या उपतालुका प्रमुख समाधान उघडे यांनी आपल्या शेतात अफुच्या झाडांची शेती केली होती. या संदर्भात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना पक्की खबर मिळाल्यानंतर त्यांनी इथल्या अफुच्या शेतात धाड टाकली. अवैधरित्या लावलेली ४८५ किलो वजनाची अफूची झाडे कारवाईदरम्यान पोलिसांनी जप्त केली आहेत. जप्त करण्यात आल्या झाडाची किंमत ही जवळपास ७२ लाख ८४ हजार रुपयांच्या घरात आहे. याप्रकरणी संशयित दोषी समाधान उघडे या पुढारी कम अफु उत्पादक 'शेतकरी' स्थानिक गुन्हे शाखेच्यावतीनं गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## पक्की टिप मिळाली, 'उघडें'चा 'काळा' धंदा उघड झाला
### अन् 'खाकी'वर्दी पोचली थेट दशमेगावच्या अफूच्या शेतात

वाशी तालुक्यामधील दशमेगाव शिवारात समाधान उघडे यांनी अफुची बेकायदा शेती पिकवल्यासंदर्भात स्थानिक गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास पक्की टिप मिळाली. इतकंच काय तर टीम देणाऱ्यांनं कारवाईसाठी कसं आणि कोठून जायचं? बांध कुठं? अफुचं पीक नेमकं कोणत्या प्लॉटमध्ये आहे, याची सगळी इत्यंभूत माहिती पोलिसांना दिली. या माहितीच्या आधारे छापा टाकरण्यासाठी पोलिस घटनास्थळी पोचले अन् समाधान उघडेंचा 'करेक्ट' कार्यक्रम झाला. 'उघडें'चा 'काळा' धंदा उघड झाला. यामध्ये नक्की कोणाला 'समाधान' मिळालं याची जोरदार चर्चा उठली आहे.

## संशयित 'समाधान' यांना ताब्यात घेतल्यानंतर
### 'उघड' होईल अशी माहिती

नशिल्या अफुची बेकायदार शेती पिकवण्यासंदर्भात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छाप्यात आढळून आलेल्या मुद्दे मालांच्या अनुषंगाने, उपतालुका प्रमुख समाधन उघडे यांच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मात्र संशयितास गुरुवार (ता.१२) रात्री उशीरापर्यंत ताब्यात घेण्यात आलेलं नव्हतं. उघडे यांना ज्यावेळी पोलिस ताब्यात घेतील आणि याप्रकरणाचा सखोल तपास करतील त्यावेळी अवैध अफु शेती केव्हा पासून पिकवली जात होती, हे पीक कुठं आणि कसं विकलं जात होतं, नशिली अफु खरेदी-विक्रीच्या साखळीत कोणाचं 'हात' होते. आदीची तपशिलवार माहिती पुढे येईल, असं स्थानिक गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनं सागितल्याची माहिती समोर आली आहे.

## 'वशिलेबाजी'बद्दल
### तर्क-वितर्ककांचं मायंदाळ पीक

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अफु शेतीवर धाड टाकली असली तरी समाधन उघडे हे उपतालुका प्रमुख आहेत. त्यांचं 'वजन' आहे. शिवाय 'खाकी'वर्दीच्या वरहस्ताशिवाय ते अफुची थेट शेती पिकवण्याचं धाडस करणार नाहीत. राजकीय वजन आणि 'खाकी'वर्दीचं 'अभय' यातून त्यांना कारवाईत सॉफ्ट' कॉर्नर मिळू शकतो. तर दुसऱ्या बाजूला विरोधक हे याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्यास भाग पाडतील. प्रकरण दाबू देणार नाहीत, अशा तर्क-वितर्काचं मायंदाळ पीक कारवाईनंतर वाशिम तालुक्यात आलं आहे.

## चर्चेची वेगळीच आवई
### राजकारणातून कांड झाल्याची माहिती

अवैध अफुचं पीक घेणारे समाधान उघडे हे ठाकरे शिवसेनेचे तालुका उपप्रमुख आहेत. त्यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी अधिक आक्रमक होऊन ताण काढला होता. अनेक आघाड्यांवर ते विरोधकांना आडवे गेले होते.त्याचा राग मनात धरुन त्यांचा 'करेक्ट' कार्यक्रम राजकारणातून झाला. विरोधकांनीच पोलिसांना करावाईसाठी टिप दिली असावी अशी आवई वाशी तालुक्यासह जिल्ह्यात उठली आहे.

## खासदार ओमराजेंची भूमिका काय असणार?



ओमराजे हे शिवसेना ठाकरे गटाचे धाराशिव जिल्ह्याचे नेते आणि खासदार आहेत. तर अफु प्रकरणात गुन्हा दाखल झालेले समाधन उघडे हे उपतालुका प्रमुख आहेत. हे लक्षात घेता, खासदार ओमराजे हे आपल्या पक्षाचा पदाधिकारी म्हणून उघडेंना 'आतून' सहकार्य करणार की पोलिसांच्या कारवाईत हस्तक्षेप करणार नाहीत, हे पाहणं महत्त्वाचं मानलं जात आहे.


# अजितदादांच्या विमान दुर्घटना प्रकरणास 'गौप्यस्फोटा'चे पंखे

## ऐनवेळी विमानांची अदलाबदली? नेहमी ब्लॅक जेट, त्यावेळी..?
## प्रमुख पायलट महिने-दोन महिने कुठल्या हॉटेलला भेटले..?

✔ सोलापूर/प्रतिनिधी


**दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघात दूर्घटनेच्या प्रकरणास आता गौप्यस्फोटाचे लागत आहेत. याप्रकरणी आमदार रोहित पवार हे आक्रमक झाल्याचे पहायला मिळत आहे. अशात मृत फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांच्या पित्यानेदेखील गौप्यस्फोट करत अनेक आक्षपार्ह मुद्दे उपस्थित केले आहेत. ऐनवेळी विमानांची अदलाबदली कशी झाली? नेहमी ब्लॅक जेट, त्यावेळी इतर विमान कसे?, प्रमुख पायलट महिने-दोन महिने कुठल्या हॉटेलला भेटले..? असे ते पवार आणि माळी यांचे आक्षेपाचे मुद्दे असल्याने हे प्रकरण आता वेगळ्या वळणावर पोचले असून नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे.**

## तिसरा डोळा
– प्रकाश पोरे



हीच ती जमीन,
जी 'N.A.' होत नव्हती !

## रोहित पवाराचं नवं वक्तव्य; दोन महत्वाचे मुद्दे केले उपस्थित



आमदार रोहित पवार म्हणाले, विमान अपघातप्रकरणी लवकरात लवकर सगळ्या आक्षेपार्ह गोष्टींची चौकशी व्हावी. २७ तारखेपासून ते २८ तारखेपर्यंत चौकशी व्हावी. जे प्रमुख पायलट होते ते पूर्वी कोणाला भेटले, महिनाभर - दोन महिने कुठल्या हॉटेलला भेटले, कुठे कुठे गेले होते, या सर्व गोष्टींची माहिती काढणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे, असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केलं आहे.

कल्याण
147-25-113
मुंबई
468-86-349



## नरेश अरोरा यांच्याबाबत मोठा दावा...

रोहित पवार यांनी कन्सल्टंट असलेल्या नरेश अरोरा यांच्या कंत्राटावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नरेश अरोरा यांचं कोट्यवधींचं कंत्राट अजित दादांना रद्द करायचं होतं. या अरोरांनी गेल्या काही दिवसांत २ विमाने घेतली आहेत, असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

## 'डीजीसी'कडून बारामती विमानतळाची पाहणी

आमदार रोहित पवारांच्या पत्रकार परिषदेच्या दिल्लीत परिणाम उमटले. बारामती विमानतळाची नागरी उड्डाण महासंचालनालयच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. विमानतळाची सुरक्षा व्यवस्था, धावपट्टीची स्थिती, तांत्रिक सुविधा तसेच आपत्कालीन यंत्रणा यांची सविस्तर तपासणी करण्यात आली. विमानतळ सुरक्षित आहे का, याबाबतचा अंतिम निर्णय पाहणीनंतर तयार होणाऱ्या अहवालावर अवलंबून राहणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून लवकरच सविस्तर अहवाल सादर केला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या पाहणीमुळे विमानतळाच्या सुरक्षा मानकांबाबत स्पष्टता येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## शिवकुमार माळी यांचा गौप्यस्फोट

### ▪ म्हणाले, अपघात नव्हे, हा तर सरळ सरळ घातपातच!



मृत पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार माळी यांनी म्हटले की, रोहित पवार यांचे सादरीकरण पाहिलं. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. घातपात सरळ सरळ दिसतो आहे. माझी मुलगी अजितदादांसोबत ५ वेळा विमान प्रवासात गेली होती. याआधी ४ वेळा ब्लॅक जेट होते, आत्ताच व्हाईट जेट का वापरले? असा प्रश्न शिवकुमार माळी यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे ऐनवेळी विमानांचा अदलाबदली झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हा घातपात तर नाही ना असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### ▪ ३००० मीटर दृश्यमानतेवर विमान का उतरवले गेले?

विमानाच्या उतरवण्याच्या वेळी दृश्यमानतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अजित पवार यांनी विचारले, जेव्हा विमान उतरवण्यासाठी डीजीसीएची मार्गदर्शक तत्त्वे ५००० मीटर दृश्यमानता आहे, तेव्हा विमान ३००० मीटर दृश्यमानतेवर का उतरवले गेले? कमी दृश्यमानता जाणूनबुजून योग्य होती का? अपघातात पायलट पाठकची चूक नव्हती का? पायलट कपूरबद्दल आमचे अनेक प्रश्न आहेत आणि आम्हाला उत्तरे हवी आहेत, आणि शक्य तितक्या लवकर, असा मुद्दा आमदार रोहित पवारांचा आहे.